# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

## प्रेसनोट

## 'पीएमपीएमएल' च्या पिंपरी – चिंचवड शहरातील मेट्रो फिडर सेवेचा शुभारंभ

महाराष्ट्र मेट्रोरेल कार्पोरेशन लि. पुणे यांचे मार्गिका पिंपरी-चिंचवड महानगरपालिका ते शिवाजीनगर सिव्हील कोर्ट मेट्रो स्टेशन पर्यंत मेट्रो दि. ०१/०८/२०२३ पासुन सुरू करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने पुणे महानगर परिवहन महामंडळामार्फत प्रवाशांच्या सोईकरीता दि. ०३/०८/२०२३ पासुन मेट्रो फिडर बससेवा सुरू करण्यात आली असून त्याचा शुभारंभ पुणे महानगर परिवहन महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. सचिन्द्र प्रताप सिंह व पिंपरी – चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त मा. शेखर सिंह यांच्या हस्ते मेट्रोच्या पिंपरी – चिंचवड महानगरपालिका स्थानक येथे वातानुकूलित ई-बस ला हिरवा झेंडा दाखवून करण्यात आला.

यावेळी पिंपरी – चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त मा. उल्हास जगताप, उपायुक्त मा. रविकिरण घोडके, सह-शहर अभियंता मा. प्रमोद ओभांसे, कार्यकारी अभियंता बापुसाहेब गायकवाड, कार्यकारी अभियंता संध्या वाघ, मेट्रोचे सिस्टम्स अॅन्ड ऑपरेशनचे संचालक मा. विनोदकुमार अग्रवाल, डि.जी.एम मनोज डॅनियल, पुणे महानगर परिवहन महामंडळाचे चीफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन) सतिश गव्हाणे, कामगार व जनता संपर्क अधिकारी सतिश गाटे, वाहतूक नियोजन संचलन अधिकारी नारायण करडे, डेपो मॅनेजर यशवंत हिंगे, सुनिल दिवाणजी व भास्कर दहातोंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पीएमपीएमएल कडून सुरु करण्यात येत असलेल्या या मेट्रो फीडर बससेवेमुळे प्रवाशी नागरिकांना मेट्रो स्टेशन्स पर्यंत पोहोचणे सोयीचे होणार आहे. तरी सदरच्या मेट्रो फीडर बससेवांचा लाभ प्रवाशी नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन पीएमपीएमएल कडून करण्यात येत आहे.

sd/-
चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

दि. ०३/०८/२०२३.

मा. संपादक,
दैनिक ..........
यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

मा. स. कळावे.

sd/-
कामगार व जनता संपर्क अधिकारी
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.